ज्ञानदीप लावू जगी

पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : संगीत शारदा
आनंदकर नाटक

प्रकाशक : उद्धव बळवंत वेणेगांवकर

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर - २०२४

सुरस नवीन चालीवर

संगीत शारदा

आनंदकर नाटक.

प्रकाशक,

उद्धव बळवंत वेणेगांवकर.

महालक्ष्मी प्रा० सं० ना० मंडळी.

मुद्रक

रा. रा. रावजी श्रीधर गोंधळेकर 'जगद्धितेच्छु'

छापखाना शनवार पेठ पुणें.

श्रीशारदा प्रसन्न.

मंगलाचरण.

पद. (चाल—उद्यां बघ जातें.)

नमूं शारदा देवी। जी सकल कामना पुरवी ॥धृ० ॥ कोणा सुंदर नार असावी। कोणा दौलत विपुल मिळावी। वाटे कांहिं न तसदि पडावी। ती त्या दावी। प्राप्तिचा मार्ग तो भावी ॥ १ ॥

सू०—अहो, श्रृंगारचतुर सभाजन हो—

पद. (चाल—सुचिन्ह हें नच दिसे.)

नाजुक सुंदर असें हें शारदा। पंचक तुह्मां रमवील सदा ॥ धृ० ॥ चिंता म-

निंची हरिल दुःखदा । सोडिल कांहीं केल्या न कदा । जाशि ज्या अनुकूल असेल संपदा । त्यापरि सेविल हें तदीय पदा ॥ १ ॥

(नटी प्रवेश करिते.)

नटी— पद. (चाल—जाऊं कामाला.)
आवडे मम मुलिला । नवरा इंग्रजि शिकलेला ॥ धृ० ॥ आइबापांनीं परि बहु त्याच्या हुंडा मागितला ॥ १ ॥ आशा नाहीं मिळण्याची ती लागलि झुरणीला ॥ २ ॥ काय करावें कोण निवारिल आतां काळजिला ॥ ३ ॥

सू०—प्रिये, आजकालच्या शारदामहोत्सवांतील ही चांदणीरात्र मोठ्या मजेनें घालवावी असा विचार करून एक अति मजेदार नाटक दाखविण्याकरितां मीं हे लोक येथें बोलाविले आहेत; तर या कामाला तुझें मला साह्य पाहिजे.

न०—जळो तें तुमचें नाटक. तुह्मांला झालें आहे तरी काय ?

पद. (चाल—या मित्रासह रंजन.)

नाटक नाटक करूनि घराचें केलें तुह्मीं वाटोळें । हांसति तुह्मां मित्र सोयरे परि नच तुमचें चित्त वळे ॥ धृ० ॥

सू०—प्रिये, मज नाटकाविण कांहीं सुचत नाहीं । बनलों यांतील मी राजा राणी तूं होईं । सखे मला आलिंगुनि चुंबन देईं देईं ॥

न०—काय बुद्धि ही झाली गेली कोठें शुद्धी मज न कळे । ऋद्धि सिद्धि घरीं पाणि भरतिल तुमच्या नाटक तपोबळें १॥

मला लागली आहे मुलीला नवरा कसा मिळेल याची काळजी; आणि इकडे पहावें तों सदोदीत नाटकांत धुंद. सगळा मेला चावटपणा आहे. मी येथें मुळीं उभीच राहूं इच्छित नाहीं. (जाते)

सू०—अग जाऊं नको थांब. अरे ही गेली! आतां नाटकाची प्रस्तावना कशी करायची ? कांहीं चिंता नाहीं. किती झालें तरी मी पुरुष आहें; तेव्हां बायकोचें आर्जव करीन कीं

काय? काल अमच्या मंडळींत एक नवीन स्त्रीपार्टी मुलगा आला आहे, त्याची परीक्षा पहावयाची आहे, तर आतां नटाचें काम त्याकडूनच करवतों. (पाहून) अरे मारिषा, इकडे ये पाहूं.

(नट प्रवेश करितो.)

नट०—काय आपली आज्ञा आहे ?

सू०—तुझ्या गायनअभिनयाची परीक्षा पहावयाची आहे; यासाठीं आजच्या नाटकांतील नटाचें काम तूं कर.

न०—ठीक आहे.

सू०—तर या शारदामहोत्सवांतील चंद्रिकेला अनुसरून तूं थोडेंसें गायन कर. मग नाटकास आरंभ करूं.

न०—मला येतें आहे तसें मी वर्णन करितों-

पद. (चाल— अजुनी खुळा हा.)

मौज जरी हा वसंत उडवी रडवी तो मला। युवयुतींच्या जोड्यांमधिं मी आहें एकला। वारुणि प्यावी मौज क-

रावी फुकट छंद लागला । बंधुभगिनि या काय कामाच्या देति न शिवराइला॥१॥

सू०—काय रे गाढवा, हें काय गाणें आहे का चेष्टा आहे ? शारदासमयीं वसंताच गाणें ! बरें तें असूं द्या. पण त्यांत तुझी रडकथा कशाला?

न०—यांत माझी चूक नाहीं माझ्या गुरूनें मला मुद्दाम खोटें वर्णन करावें ह्मणून सांगितलें आहे.

सू०—त्यांनीं तसें सांगण्याचें कारण?

न०—नाटकासंबंधीं ते असें ह्मणत कीं—

साकी.

नाटक खोटें दागिने तसे बागबगीचे खोटे । खोटे स्त्रीपार्टिहि मंडळिचें देणें घेणें खोटें । पैसे मात्र खरे । घेती टिकिटें विकुनि पुरे ॥ १ ॥

सू०—तुझ्या गुरूनें असें तुला सांगितलें काय ? तो एक पाजी आणि त्याचें ऐकणारा तूं सात पाजी. तुझा अवाज चांगला नाहीं आणि आंगीं लीनपणाही नाहीं; तेव्हां तुला

आमच्या नाटकात राहणें असेल तर हीं कामें केलीं पाहिजेत.

साकी.

स्त्रीपार्टि मुलांचीं तूं दिवसा धूत धो-
तरें जावीं । रात्रीं तीं रंगत असतां त्यां
तूं लुगडिं नेसवावीं । चुकुं या कामीं
नये । पगार कांहीं मागुं नये ॥ १ ॥

आहे तुला ही गोष्ट कबूल ? नसेल तर आतांच चालता हो.

न०—मी असलीं घाणेरडीं कामें कधीं करणार नाहीं. हा पहा मी चाललों. (जातो.)

सू०—नटी रागावून गेली आणि नटही पण गेला; तेव्हां आजच्या नाटकाच्या प्रस्तावनेला वेळ चांगली लागली नाहीं हेंच खरें. चला तर आतां आपण प्रस्तावनेच्या मानगडींत न पडतां आतां एकदम नाटकासच सुरवात करूं.

(असें ह्मणून जातो.)

प्रवेश १ ला.

स्थळ—देऊळ.

(ब्राह्मण प्रवेश करितो.)

ब्राह्मण—पद. चाल—(अंबिके अंबिके)

शारदे । शारदे । शारदे । तूं द्रव्य मला बहु दे ग दे॥धृ०॥विद्या मुळीं मी मागत नाहीं । पर्या करितों नच कीर्तिचिही । एक द्रव्य जरि हातीं येई । कोण काय मग वदे ॥ तूं० ॥ १ ॥ नाटक मंडळीला शनिवारीं । पैसे देसी भरूनि पेटी पुरी। माझ्या दिडकी ठेविसी नच करिं । सतत तुजपुढें मी रडें ॥ २ ॥

काय करूं ? या शारदा देवीची आज अनेक कष्ट सोसून मीं तपश्चर्या केली; मला ही पावेल असा माझा भरंवसा होता; पण कांहीं नाहीं. ही मला कांहीं प्रसन्न होऊन द्रव्य देत नाहीं. बाई देवी, तूं अशी कां मजवर रुष्ट झालीस ? तुला स्वतः देववत नसेल तर असें तरी कर कीं, कोणी एखादा सावकार माझ्या

घरीं रात्रीं उतरायला यावा, त्याच्या जवळ त्या वेळीं दहा हजार रुपये असावे आणि तो एकदम सर्पदंश होऊन मृत्यु पावावा. ह्मणजे ते दहा हजार रुपये आयतेच मी दाबून टाकीन. किंवा कोणाच्या घरीं मी गेलों असतां तेथील सगळीं माणसें एकाएकीं वाख्यानें मरावीं ह्मणजे त्या घरांतील द्रव्य मला लांबवून आणतां येईल. शिव शिव ! दारिद्र्यानें माझी काय अवस्था झाली हो—

पद. (चाल—मित्रा मम जन्मकथा)

अन्नाविण झालों मी कितिक रोडका ।
सर्व शिरा दिसति जणुं दिसत दोडका।
दुर्दैवें मजजवळी नाहीं आडका । हिं-
डतों मी रस्तोरस्तिं सतत बोडका १॥

ही देवी शारदा कांहीं मला पावत नाहीं. आणि माझ्याजवळ कांहीं पैसे येत नाहींत. तें कांहीं नाहीं. देवी पावत नाहीं ह्मणून मी कांहीं कष्ट केले नाहींत असें होत नाहीं. या देवीविषयींचा पूज्यभाव आतां नष्ट होऊन मला

तिचा राग आला आहे. पण आतां काय करावें? (नीट पाहून) हं हें बरें आहे. या देवीच्या अंगावर सोन्यामोत्यांचे बरेच डागिने आहेत, ते मला मिळाले ह्मणजे माझें कार्य होईल; पण ते आपण चोरून घेऊं इच्छित नाहीं. तर मग ते कसे मिळणार? (वि. क.) हं हीच युक्ति बरी आहे. (देवीच्या अंगावरचे डागिने काढितो.) आतां हे डागिने मला देवीनें दान केले असें करावें. हे डागिने मी देवीच्या हाताखालीं धरितों व देवीच्या हातावरून या पंचपात्रींतील पाणी माझ्या हातावर पडेल असें करतों. ह्मणजे हे देवीनें मला संकल्पपूर्वक दान केले असें ह्मणतां येईल. (तसें करून) वाहवा ! देवी शारदे, तूं मला प्रसन्न होऊन हे डागिने दिल्यानें मी कृतार्थ झालों. आतां तपश्चर्या पुरी करून मी आपल्या घरीं जातों.

साकी

लग्न करिन मी शारदेशिं त्या आवडलि
मज ती पोर। वृद्धपणीं तिस तरुण

दिसे पति मिळतां त्या धनजोर । ती
स्त्री होण्याची । आतां खोटि नसे साची१
(असें ह्मणून जातो.)

प्रवेश २ रा.

स्थळ—रस्ता.

(बैरागी प्र० क०)

बै०—पद. (चाल—रतिविलास गंगे.)
मी बैरागि फक्त नांवाचा । कंटाळा मज
देवाचा । बहुनाद भांग गांजाचा । गुण
लोकां फसवायाचा । मनिं असे शोक
तमाशाचा । नाच्या मांडिवरि घ्यायाचा१

मीं हें भिक्षापात्र घेऊन जी घरोघर भिक्षा मागतों, ती केवळ कोणापाशीं काय आहे याची टेहळणी करण्याकरितां. पण माझा मुख्य व्यापार दुसऱ्याला फसवून किंवा अन्य तऱ्हेनें त्यास गोत्यांत आणून आपला खिसा भरायचा हाच आणि याला साधन ह्मणजे काय तर लबाडी. ठीकच आहे—

पद. (चाल—सुखोपभोगा योग्य.)

लबाडि वांचुनि नच. कोणाचा चाल-
तसे व्यापार । ती नच येई ज्यासी
त्याचा फुकट असे व्यवहार । भांडवल
जरी मग त्यापाशीं असलें अपरंपार ॥
तरि जाणावें सत्य तयाचा फडशा कीं
उडणार ॥ १ ॥

आज बरेच दिवसांत मला कांहीं चोरायला सांपडलें नाहीं व कोणाला फसवायलाही सांपडलें नाहीं. तेव्हां आज कांहीं तरी उद्योग केलाच पाहिजे. एक चिलीम खाक करतां करतां आतां त्याचा विचार करूं (चिलीम ओढतो.)

(ब्राह्मण प्र० क०)

ब्रा० पद. (चाल—मज गमे ऐसा.)

आवडते दुधाशीं मज शिळी । पुरण-
पोळी ॥ धृ० ॥ चटणी लसणाची प्री-
तीची । भाजी दुसरि न जशि कांद्या-
ची ॥ ती मिळतां शारदेच्या करिंची ।
होइन धन्य जगीं त्या काळीं ॥ १ ॥

मला द्रव्यलाभ तर झालाच आहे; पण नु-

सत्या पैसेवाल्या भटाला ती शारदा वश होईल असें मला वाटत नाहीं. तर मला लोकांनीं रावसाहेब म्हटलें पाहिजे; म्हणजे मी कोणी अब्रूदार गृहस्थ आहें असें ती समजून मला माळ घालील. पण आतां लोक मला रावसाहेब कसें म्हणणार याला कांहीं उपाय दिसत नाहीं.

बै०—कां भटजीबुवा, कुणीकडे चाललां ? चिलीमबिलीम पितां का ? या.

ब्रा०—कां रे गोसावड्या, तूं मला ओळखलेंस का ? मी आतां पूर्वीचा भट्ट नसून रावसाहेब झालों आहें समजलास !

बै०—वारे रावसाहेब भट्ट, तुला वेडबीड लागलें असें वाटतें.

ब्रा०—पण मी रावसाहेब कां असूं नये ? कारण इतर रावसाहेब ह्मणवून घेणारांजवळ जितका पैसा असतो तितका माझ्याजवळ आहे.

बै०—अरे मूर्खा, नुसता जवळ पैसा असून

कोणी रावसाहेब बनत नाहीं. तर ते पैसा खर्चून रावसाहेब बनतात.

ब्रा०–पण कां हो गोसावीबुवा, पैसा खर्च करून तरी मला सारे रावसाहेब म्हणतील का?

बै०– कां नाहीं म्हणणार ? तूं पैसा खर्च करायला तयार हो. कीं, मी तुला सर्वांना रावसाहेब म्हणून नमस्कार करायला लावतों.

ब्रा०–जर तुम्हीं पत्कर घेत असलां तर मी पैसे खर्च करितों; पण हें पहा, लहान मोठ्यांनीं सर्वांनीं मला रावसाहेब म्हणून मुजरा केला पाहिजे.

पद.(चाल—नको विवाहचि हा.)

जरि रावसाहेब झालों मी । रुपये पांचशें बक्षिस ह्मणुनी । देइन तुजला या कामीं ॥ ध्रु० ॥ गोष्ट किती मग होईल नामीं ॥ शारदा ॥ मम संपदा ॥ बघतांचि सदा ॥ देई सलामी ॥ १ ॥

बै०–(मनांत) हा भट्ट शुद्ध भोळा असून वेडाही आहे, तर या वेळेस आपल्या क-

रामतीची परीक्षा पाहिली पाहिजे. (उघड) ठीक आहे. आण पांचशें रुपये माझ्याजवळ. मी खात्रीनें तुला रावसाहेब बनवितों.

ब्रा०–ही घे थैली. हिच्यांत पांचशें रुपये आहेत.

बै०–बरें, आतां असें कर. हे पांच रुपये घेऊन जा आणि एक गुळाची ढेप घेऊन ये.

ब्रा०–मला रावसाहेब होण्याला गुळाची ढेप कशाला ?

बै०–तूं आतां मी सांगतों त्याप्रमाणें कर. आपली अक्कल लढवूं नकोस. जा ढेप आण.

ब्रा०–(ढेप आणून) ही घे ढेप.

बै०–आतां मी सांगतों त्याप्रमाणें कर. तूं त्या मारुतीच्या देवळाच्या पायरीवर आकाशाकडे डोळे लावून पहात बस. तेथें मुलें येऊन तुला रावसाहेब म्हणूं लागतील तर तूं त्यांच्यावर कातावल्यासारखें कर आणि रस्त्यांतले धोंडे घेऊन त्यांना मारायला लाग. पहा यांत चुकूं नकोस.

ब्रा०—ठीक आहे, तूं सांगितल्याप्रमाणें करतों.

बै०—अरे पोरांनो, या, या, या, लौकर इकडे या.

(कांहीं मुलें धांवत येतात.)

मुलें०काय ह्मणतां, काय गोसावीबुवा ?

बै०—(त्यांस गूळ देऊन) हें पहा, हा गूळ घ्या तुह्मांला, आणि मी सांगतों तें काम करा.

मुलें—सांगा, आह्मी करितों.

बै०—हें पहा, त्या मारुतीच्या देवळाच्या पायरीवर तो भट्ट बसलेला आहे ना, त्याच्या पाशीं जाऊन तुह्मी त्याला ' रावसाहेब नमस्कार' असें ह्मणा, तो चिडला तरी ह्मणायला राहूं नका. जा. ह्मणजे मग तुह्मांला आणखी गूळ देईन.

मुलें—ठीक आहे. (जातात व पळत पुनः येतात त्यांच्या मागें धोंडा घेऊन लागलेला

ब्राह्मण येतो. मुलें व्यास 'रावसाहेब नमस्कार' ह्मणतात)

ब्रा०—काय रे काटर्चांनो—

दिंडी.

पुनः बोला कीं मला रावसाहेब ॥ घालितों हा डोक्यांत दगडसाहेब ॥कोणी लुच्यानें देउनी तुह्मां गूळ ॥ लावण्याला धाडिलें मला खूळ ॥ १ ॥

मुलें—रावसाहेब, नमस्कार घ्या आमचा नमस्कार.

ब्रा०--चला व्हा दूर,कां घालूं डोक्यांत धोंडा.

बै०—कां तूं रावसाहेब बनलास कीं नाहीं ?

ब्रा०—होय. मला रावसाहेब बनवण्याची तुला ही चांगली युक्ति सुचली ह्मणावयाची.

बै०—आतां तूं जा आणि कांहीं दिवस असाच आपला वर्तनक्रम ठेव. आज तुला मुलें ह्मणायला लागलीं; उद्यां मोठीं माणसें, परवां बायका, सारे आतां तुला रावसाहेब ह्मणायला लागतील.

ब्रा०–ठीक आहे. आतां मी जातों.

(जातो.)

बै०–वाहवा ! आज अवचित हा मला काय लाट मिळाला पहा––

साकी.

गाफिलका माल अक्कलवानका खुराक आशि जी लोकीं ॥ ह्मण आहे ती प्रत्ययास मम आज खचित आली कीं ॥ रुपयांची थैली । मिळूनि चंगळ मम झाली ॥ १ ॥

प्रवेश ३ रा.

(शारदा सख्यांसह झोंपाळ्यावर बसली आहे.)

गाणें. (चाल–चंद्रकांत राजाची कन्या.)

इंग्रजिमध्यें जिकडे तिकडे मौज दिसुनि येई ॥ दिवा लावण्या चिमणी आली बुडली ती समई॥सकाळिं उठुनी चहा कॉफिची करिति पुरुष घाई॥निजस्त्रीसह मग हवा खावया जाति निघुनि पाहीं ॥ साहेब मडुम यांशीं त्यांचा

शेकहॅन्ड होई ॥ पाव बिस्किटें खातां वाटे सुख स्वर्गाहुनिही॥ बुधवार शनिवारीं नाटक तें कधीं चुकत नाहीं ॥ चैनीवांचुनि चैन नच पडे संवय लागली ही ॥ किति वर्णावी फॅशनची जी आहे नवलाई ॥ स्त्रिया पुरुष शाहणे जिवाची करिति रोषनाई ॥ १ ॥

शा०—सख्यानों, ही समोर मोहिनीची तसबीर आहे, ही किती तरी चांगली आहे. ती बाई मोहिनी झोंपाळ्यावर कशी ऐटीनें झोंके घेत आहे ती पाहिलीत का ?

१ स०—अग पण ती एकटीच आहे. मग त्या तिच्या ऐटींत तुला काय मेलं इतकं कौतुक वाटलं ?

२ स०—खरंच ती जर नवऱ्यासह बसली असती तर फारच चांगली वाटली असती. मग शारदे, तूं खचित तिचा हेवा करायला पाहिजे होतास !

शा०—जळल्या तुमच्या मेल्या कधीं ऐ-

काव्या त्या आपल्या भलत्याच गोष्टी. अग मी ती तसबीर काढणाराच्या कौशल्याचें वर्णन करणार होतें.

१ स०—असं का ? बाई माझ्या नाहीं तें लक्ष्यांत आलं.

२ स०—अग, शारदा हें उगीच वरवर बोलत आहे. आतां आपण ह्मटलं तें गाणं तिनंच केलं आहे ना ? त्या गाण्यावरून तिच्या मनांत आपल्या नवऱ्याविषयीं काय विचार घोळत असावेत हें नाहीं का तुझ्या लक्ष्यांत येत?

१ स०—मी बाई दिलेल्या बुद्धीची आणि सांगितल्या कामाची आहें. माझ्या नाहीं लक्ष्यांत येत. तूंच सांग पाहूं तिच्या मनांत काय आहे तें ?

२ स०—तिच्या मनाला असं वाटतं—

पद. (चाल— अर्पिलें सुमन तें.)

आपुणा मिळावा पति इंग्रजि फॅशनचा । नसावा जाच सासूचा । मुळि

नको दीर जावांचा ॥ वारा ॥ पसाराही पोराबाळांचा ॥ १ ॥

१ स०—अशी का तिची इच्छा आहे? ती नाहीं बाई माझ्या लक्षांत आली. शारदे, देव तुझ्या इच्छेप्रमाणेंच तुला इंग्रजी शिकलेला आणि सुधारलेला नवरा देईल बरं—

पद. (चाल—ह्मातारा इतुका न.)

धर्मा मानुनि झूट ॥ सेविल ब्रॅन्डि चहा बिस्कूट ॥ ध्रु० ॥ इंग्रजि वांचुनि कांहिं न बोले ओढिल नित्य चिरूट ॥ फॅशन करितां करितां पडेल पैशाची त्या तूट ॥ दागिने नको तुज मडमेचा घालिल आणुनि सूट ॥ आपण फेंकुनि धोतरजोडा घेईल विजार बूट ॥ १ ॥

शा०—काय ग तुह्मीं दोघींनीं माझी अशी चेष्टा मांडली आहे. हो मला तसाच नवरा पाहिजे आहे बरं का ? त्यांत तुमचं काय जातं? तुह्मी देतां कां मला तसा नवरा मिळवून ?

१ स०—अग, आह्मीं बोलून चालून पोरी

त्या काय तुला तसा नवरा पाहून देणार; तूं आपल्या आईला सांग, ह्मणजे ती तुझ्या बापाकडून तुला तसा नवरा पाहवील.

२ स०—नाहीं तर शारदे, मला एक युक्ति सुचली आहे. तूं गडे स्वयंवरच कर. ह्मणजे तुला मनाप्रमाणें नवराही मिळेल आणि साऱ्या बायकांत तुशी कीर्ति होऊन जिच्या तिच्या तोंडीं तुझें नांव होऊन राहील.

शा०—तुह्मीं काय वाटेल तें बडबडा. ही मी निघून जातें. (जाते.)

१ स०—अग, ही रागानें निघून गेली.

२ स०—जाऊं दे; गेली तर गेली. चल आपणही आपल्या घरीं जाऊं. पण तिच्या मनांतलं कसं मीं ताडलं पाहिलंस ना ?

१ स०—होय खरंच. आतां तिला कोण बालिष्टर नवरा मिळतो का वकील मिळतो तें आपणच पाहूं. (दोघी जातात.)

प्रवेश ४ था.

(आनंदकर आणि बाबू.)

आ०—बाबू, आतां पाय चेपणें पुरे कर. आणि पेटीवर बसून एक छानदारसें पद ह्मण पाहूं.

बा०—(वाजवतो.)

पद (चाल—दृष्टि भरे जलभारें.)

किति नामि नाटकाचा ॥ आमुचा हा सुखाचा ॥ धंदा पण साचा ॥ ध्रु० ॥ लोक लागती सर्व नादिं या नच तोटा आम्हां पैशाचा ॥ १ ॥ मुभा असे वाटेल तें करण्या धाक न खाया प्याया कोणाचा ॥ २ ॥

आ०—शाबास; बाब्या ! बहार केलीस.

बा०—पण मला तुह्मी आज एक वॉच द्यावयाचें कबूल केलें होतें तें केव्हां देणार ?

आ०—असा उतावळा कां झालास ! देईन तुला कधीं तरी मी एक वॉच घेऊन देईन.

बा०— मी नुसतें वॉच घेणार नाहीं; मला तुह्मीं इतक्या जिनसा आतां दिल्या पाहिजेत—

साकी.

लाल जरीचें जाकिट तैसें मनि-पाकिट सुंदरसें ॥ छत्री वाटरप्रूफ छड्यासह वॉच मला द्या खासें ॥ हें नच द्याल तरी ॥ रागावेन मी तुह्मावरी ॥ १ ॥

आ०—ठीक ठीक; तुझें मागणें अगदीं थोडेंसेंच आहे ह्मणावयाचें. बरें, तुला आज नाहीं ह्मणून तुझें मन दुखवावयाचें इतकें काय अडलें आहे. देऊं तुला या साऱ्या जिनसा घेऊन देऊं बरं. बरं, आतां तूं जा आणि उद्यां ये; मला आतां कामाला जायचें आहे.

बा०—पण मला तुह्मीं आतां कांहीं तरी दिलें पाहिजे त्याशिवाय मी येथून नाहीं जायचा.

आ०—असें काय ! बरें तर हा घे (साबण देतो.)

पद (चाल—सुकुमार असूनि तूं फार)

रे बाबु असासि तूं खाबु घेई हा साबु

लावि अंगाला ॥ तव ढंग बघुनि वाटतें तुज घडावया विधि चुकला ॥ १ ॥ स्त्रीपार्ट स्वीट आणि शॉर्ट बघुनि मम हार्ट होइ तल्लीन ॥ तुज पुढें नाटकांतले नृपति जाहले लीन ॥ २ ॥ जगदिशा देई नच मिशा दाढि ही अशा नाटकी पोरा ॥ उपयोग होऊं दे याचा नाट्य-कलेला सारा ॥ ३ ॥

बरें तूं जा आतां. (बाबू जातो.)

आ०—आज कोण वार बरं; हं अरे आजच अदितवार. तिचा आमचा भेटीचा संकेत आजच ठरलेला आहे नाहीं का? तर मग आतां तिजकडेसच जावें.

दिंडी.

करूनि उत्तम पोषाख शारदेला ॥ जातों एकिकडे भेट द्यावयाला ॥ पती शिकलेला मी असें योग्य तीतें ॥ तीहि शिकलेली वधु आवडेची मातें ॥ १ ॥

प्रवेश ५ वा.

स्थळ—रस्ता.

(एक भट प्र० क०)

भट०—अरे लुच्या बाळंभटा, मी येथें नाहीं, अशी संधी पाहून त्या अंमळपूरच्या जहागीरदारास तूं मीच येथला क्षेत्रोपाध्याय असें सांगून त्यापासून मला मिळावयाची ती दक्षणा उपटलीस काय ? कांहीं चिंता नाहीं. याचा वचपा काढीन बरं काढीन. (तपकीर ओढून)

पद. (चाल—नृपतनयेवर.)

बाळंभट्टा करिशी सट्टा देशी बट्टा मज नामी ॥ हाणिन रट्टा पेटुनि हट्टा वैरी कट्टा बनलों मी ॥ चाल ॥ काय तुझि कथा माझिया पुढें ॥ पोर तूं मला गमसि बापुडें ॥ परत दक्षिणा घ्यावया पडे ॥ तोंड करुनियां दक्षिणेकडे ॥ ॥ चाल ॥ उपयोगी या कामीं ॥ येइल मामा नच मामी ॥ १ ॥

(जातो व एक चैनी मनुष्य प्र० क०)

चैनी०–अहाहा ! काय या पैशांत जादू आहे पहा–

पद. (चाल–बहु मूल्य बहुविध.)

जानिं एक वस्तु प्रिय सर्वांना कोणती ती पैसा ॥ नच कांहीं मिळे त्याविण जो तो मागतसे पैसा ॥ आइ पैसा बाप पैसा मित्र पैसा पुत्र पैसा ॥ १ ॥ पार्शि फॅशन कोट करण्या मज हावा पैसा॥ खरें नको पण खोटें न मिळे वॉच जरि पैसा ॥ आइ पैसा बाप पैसा मित्र पैसा पुत्र पैसा ॥ २ ॥ मानिं चैन वाटे बहुत करावी पण नाहीं पैसा ॥ सांगित नाटक बघावया तारि आहे कोठें पैसा ॥ आइ पैसा बाप पैसा देव पैसा देव पैसा ॥ ३ ॥

(जातो. दुसरा एक गृहस्थ प्र० क०)

गृ०–हाय रे देवा, आतां काय करूं ?

पद. (चाल–घेऊनि ये पंखा.)

ही कथली गर्मी मम कर्मी काशि होती तरी ॥ लागलि बहुवर्मी औषध इस या-

जन्मीं ॥ नच मिळुनी होय बरी॥ कशि होती तरी ॥ ध्रु० ॥ वीसनखी कुत्री तरुणपणीं डसली ॥ विष न कुणी सहन करी ॥ कशि होती तरी ॥ १ ॥ वरुनि दिसे गोरी अंतरिं आग खरी बहु फसले आजवरी ॥ २ ॥

देवा, आतां माझा हा सारा जन्म फुकट जाऊन मी सडून सडून मरणार ना ? आईबापांनीं रंडीबाजी करूं नको म्हणून मरेपर्यंत पुष्कळ उपदेश केला. पण त्यांचें मी कुठें ऐकलें ! मी झक मारावयाची ती मारलीच !

वैद्य–(प्र० क०) घ्या, घ्या, गर्मीचा दवा; अगदीं स्वस्त. तीन तासांत हटकून गुण पहा—

पद. (चाल–हे वीरानों झाणिं.)

हे तरुणांनों आडवाटेनें जरि असलां जाणार ॥ विकत दवा .मम घेउनि ठेवा हा कामीं पडणार ॥ स्वस्त स्वस्त नको नित्य पथ्यही गुण हटकुन देणार॥

साधी कथली कसलिही गर्मी यानें बरि होणार ॥ १ ॥

त०—बाबा रे, मला झालेली गर्मी या तुझ्या औषधानें बरी होईल का ?

वै०—यांत काय संशय ! मला तुमचा चेहरा नीट पाहूं द्या. (पाहून) अरे बाप रे ! तुमच्या अंगांत नखशिखांत गर्मी भरली आहे. पण माझ्या औषधानें ती खात्रीनें बरी होईल. तुह्मी हें औषध घ्या. आणखी दुसरें अगदीं खात्रीचें आहे तेंही घ्या.

त०—तुझ्या त्या औषधाची किंमत काय ?

वै०—या औषधाच्या पुडीची किंमत चार आणे; पण दुसरें महाग आहे, पण तें अगदीं गर्मीवर रामबाण आहे. तें पांच रुपये तोळ्यावर मिळेल.

त०—मला गुण येण्यास तें किती तोळे घ्यावें लागेल ?

वै०—एक तोळा बस. फार तर आणखी एक तोळा.

त०—हे पाच रुपये घे आणि मला एक तोळा दे. पण गुण आला कीं नाहीं हें तुला कळवायाला तूं रहातोस कोठें तें सांग.

वै०—हें घ्या औषध. मी गांवाबाहेरच्या मारुतीच्या देवळांत असतों.

त०—बरें मी तुला तेथें येऊन भेटेन. (जातो.)

वै०—तूं बरा कोठून होणार? औषधांत गुण असेल तर बरा होशील कीं नाहीं? आणि तसें गुण देणार औषध मजजवळ असतें तर मग मी असा भीक मागत कां रस्त्यानें फिरतों?

पद. (चाल—पैशावांचुनि मौजा.)

औषध कसचें आणि काय कसचें केवळ पोटाचा धंदा ॥ गतवर्षी बैरागी होतों वैदू बनलों पहा यंदा ॥ मूर्ख भोळे तरुण बिचारे घेति दवा हा तिनतिनदा ॥ फसति पुनः पुनः शेण खाती कधिं न सोडती या नादा ॥ रे तरुणा तूं उद्यां मरायचा तो मर आज

मतिमंदा ॥ पांच रुपये मज झाला फा-
दा आतां कुणि निंदा कीं वंदा ॥ १ ॥
आतां आपण आपला रस्ता धरावा हें बरें.
(जातो.)
(तमासगीर पेटी घेऊन येतो)

दिंडी.

द्या रे पोरांनो फक्त एक पैसा ॥ करम-
णुकीचा हा पहा खेळ खासा ॥ विल-
क्षण ज्या असती जगीं गोष्टी ॥ तुम्हां
दाविल त्या सर्व माझी पेटी ॥ १ ॥

पोरें०--(येऊन) अरे हा घे पैसा. हा याचा आणि हा माझा. हं हे दोन पैसे घे. आतां दाखवि मौज.

त०—हें पहा, एकेकजण एकेक भिंगां-तून पहा--

साकी.

नवरा बायकोचा शृंगार पहा ही दारु-
बाजांची झोंबी ॥ सासूस चोरुनि सून
पहा तूपसाखर घशांत कोंबी ॥ पुढें
पहा पैसे ॥ मुलगा पोटींतिल चोरि कसे १

हं आणखी पहा—

पद.

हा लंडनका वेपारि विकी इराणात अफू चोरोनी ॥ ह्मणोनि याला फटके मारिती शिपाई हात बांधोनी ॥ पारिसचा पूल पहा लोक जाति किति यावरुनी ॥ हा इजिप्तमधिं असे मनोरा लाख वर्षें झालीं बांधोनी ॥ पुढें पहा ही आनंदीबाई कृति करीतसे सैतानी ॥ नारायणराव मारवि कैशी हातानें धचामा करुनी ॥ १ ॥

हं आटपलीं चित्रें चला आतां.

(पोरें जातात.)

त०—आतां दुसरीकडे जावें (जातांना गाणें ह्मणतो.)

पद. (चाल—तुह्मां तो शंकर.)

नमामि जी० आय० पी० रेल्वे कंपनी खंडाळ्याचा घाट भेदुनि आगगाडि पुण्यापासुनि नेउनी झटदिनी पोंचविशि मुंबई लागुनि ॥ रेल्वे कंपनी ॥ १ ॥

(दोघे दारूबाज येतात.)

१ ला--मित्रा, तुला काय सांगूं ?

पद. (चाल-स्वार्थी प्रीति.)

दारू ॥ ही देशि लागते नच मारू॥ध्रु०॥
विलायती नच घ्यावी ह्मणती आतां
काय करूं ॥ स्वदेशि चळवळिच्या नां-
वानें बोंब किती मारूं । ब्रँडीविण चा-
लावें तरि कसें हें शरिराचें तारूं ॥ १ ॥

२ रा-खरंच मित्रा, ब्रॅन्डीची मजा ब्रॅन्डि-लाच- झक मारते ती स्वदेशी चळवळ. आप-णास ती मुळींच पसंत नाहीं. हा पळ्या ब्रॅ-न्डिच पिणार.

१ ला-अरे, पण तूं आज अगदीं पुरा तर झाला आहेस. माझ्या अंगावर सारख्या झोकांड्या घेत आहेस. या ओटयावर जरा बस तरी.

२ रा-अरे, तूंच झिंगलेला दिसतोस. आणि उलट मलाच झिंगलेला ह्मणतोस काय ? बरें

बस तर बस, बस या ओट्यावर. आमळशानें घरीं जाऊं.

(दोघे बसतात.)

१ ला–मित्रा, घरीं आतां मुळींच आज जायचें नाहीं; या वेळीं मीं अगदीं खुषींत आलों आहें तर—

पद. (चाल–सदर.)

ब्रँडी ॥ पिउनि खाऊं वर अंडीं ॥ ध्रु०॥
चांदण्यांत मग फिरण्या जाऊं सर्वांचि
नवि रंडी ॥ १ ॥ घरींजाउनि काय उ-
तरायाच्या असती उतरंडी ॥ २ ॥
आज मौज करूं आपण पुरती कोण
आह्मां दंडी॥ ३ ॥

२ रा–ठीक आहे; तूं म्हणतोस तसेंच करायचें.

(एक अंधळा येतो.)

अं०–माझे माय बाप; माझी कोणाला अंधळ्याची दया येऊं द्या; मला एक पैसा द्या.

पद. चाल–(विठूचा गजर.)

द्या पैसा आंधळ्याला खंडोबाच्या नां-
वानें ॥ तुह्मांला सुखि राखिल तो गरि-
बाच्या दानानें ॥ द्या हो द्या ॥ कमि ना-
हीं पडे कांहीं एक पैशानें ॥ दे दाता
हातावरि या द्यावें तुह्मां बहु देवानें ॥१॥

१ ला–अरे अंधळ्या, तुझ्या त्या खंडो-
बाच्या आणि रोडकोबाच्या नांवाची आह्मांला
कांहीं किंमत नाहीं. आह्मी खुषींत आहोंत
तेव्हां आह्मांला हसूं पुष्कळ येईल असें जर
एखादें गाणें ह्मणालास तर आम्ही तुला एक
नाहीं तर दोन पैसे देऊं.

अं०–बरें माय बाप; मला एक गाणें येत
आहे तें म्हणतों—

पद. चाल–(मम जन्मकथेला.)

अगे तूं मोठी असली खोटी म्युनिसि-
पालिटी ॥ धृ० ॥ कंदिल लाविशि तेणें
होई आह्मां अडचण फार ॥ वकला-
च्या घरीं जातां दारु पितां लोक

आह्मां बघणार ॥ आमुची हाकाटी होई पाठोपाठीं असासि खोटी म्युनिसिपालिटी ॥ १ ॥

२ रा—वाहवा ! बहार केलीस ! घे तुला चार पैसे. (पैसे देतो.)

अं०—देव तुमचं कल्याण करो. (जातो)

२ रा—पण मित्रा, चांदणें पडायला अजून पुष्कळ अवकाश आहे; घरीं जायचं नाहीं. मग जायचं तरी कुठें ?

१ ला—अरे, तुला आतांपर्यंत मी सांगायलाच विसरलों. त्या गणेशपेठच्या बाजूला ती लांब गल्ली जाते—ती तेथें एक टाऊक आहे.

२ रा—सांग सांग काय आहे तें ?

१ ला—चल तुला चालतां चालतां सांगतों—

पद. चाल- (अंगिकार करुनि.)

त्या गल्लीमधीं आहे एक वक्कल ॥ बहु भोळें नाहीं त्या मुळिंच अक्कल ॥ यजमान त्याचि काय सांगु नक्कल ॥ तत् डोकिस पडलेंरे थोर थोर टक्कल ॥ मि-

ळवूं तें काढुनियां कांहीं शकल ॥ एक-
घाव मारुनि करूं दोन छकळ ॥ १ ॥
(सर्व जातात)

प्रवेश ६ वा.

(सचिंत शारदा प्र० क०)

पद. (चाल–कधिं करिती लग्न.)
चहुंकडुनी देव माझ्या राशीला लाग-
ला ॥ ध्रु० ॥ हुंडा न बाप देतसे ॥ त्या-
मुळें कुणि न पुसतसे ॥ रूप हें लावि
मज पिसें ॥ नवरि गरिब पति काळा॥१
आनंद आवडला मना ॥ जरि मुकें बा-
पाच्या धना ॥ पाहुनी मुख्य दागिना ॥
तत्करिं मीं कर दिधला ॥ २ ॥

आज अजून कां बरें स्वारीचें येणें होत नाहीं. (पाहून) तें कोण येत आहे ? समजलें; तो मेला थेरडा ब्राह्मण ! मेला माझ्या बापाला हजार रुपये देऊन मला बायको करूं ात आहे. या वेळीं आपल्या शिक्षणाचा

उपयोग धैर्यानें करून आपण या जिवंत मरणांतून सुटलं पाहिजे. मालतीला जसा तो नंदन होता, तसाच हा मेला आहे. हा मजपाशीं लाळ घोटायला येत आहे; तर आतां मला याची चांगली पूजा केलीच पाहिजे.

ब्रा०–(प्र० क०) शारदे, तूं मला येथें एकटी भेटलीस हें माझें मोठें भाग्य समजलें पाहिजे.

शा०–तुमचें भाग्य आणि माझें दुर्भाग्य, बरोबर समजूं या.

ब्रा०–शारदे, तूं मूळामुहूर्तीं असं ह्मटलंस तर मी सुखाची आशा कशी धरावी ?

शा०–थेरड्या, शांतिरस्तु, पुष्टिरस्तु करणाऱ्या भटुरग्या, कसली रे सुखाची आशा करतोस ?

ब्रा०–छे, छे, असें ह्मणूं नकोस—

साकी.

लग्न लावुनी तुजसी करावा संसाराचि आनंदें ॥ मन्मनिं इच्छा असे हिला तूं

अनुमोदन झट दे दे ॥ दागिने बहु परि-
चे ॥ घालिन तुजला मी साचे ॥ १ ॥
शारदा०–(चाल–ही यवनाची जात.)
मेल्या मर्कटा करिसिअर्कटा काय तर्कटा
अशापरी ॥ तुझ्या लेकीसमान असुनि
मी लहान तुझा धरूनि कान देतें तोंडांत
तरी ॥ नको राहूं जोरांत तुझा होईल घात
या ह्यातारपणांत ह्मण हरि हरि ॥ हा म-
दन गाढव नाहीं अब्रची या चव तुझ्या
कर्माची ढवढव करिल पुरी ॥ १ ॥

शा०–मेल्या, तुझ्याशीं लग्न करायला तुझ्या माझ्या वयांत, रूपांत कीं गुणांत कांहीं तरी साम्य ?

ब्रा०–तुला तसें वाटत नाहीं; पण मला तर तुझा माझा जोडा फारच चांगला होईल असें वाटतें —

पद. (चाल–रतिविलास गंगे.)
पहा जोडि ग्रंथ आणि पोथी । तुझि
माझी तशी होईल ती । मी कंदिल तूं

मेणबत्ती मी महिना तूं मम मित्ती ॥
मी तबला तूं गे पेटी । मी विडा आणि
तूं पट्टी । मी लेप तूंगादी ती । मी किल्ला
किल्ली शारदा ती ॥ १ ॥

शा०—चल, मेल्या चावटा; आतां एक अक्षर बोलूं नकोस आणि इथें उभा राहूं नकोस; नाहीं तर हे माझे हात तुझ्या थोबाडाची चांगली संभावना करतील.

ब्रा०—तूं तोंडांत मारशील; पण मी तर तो तुझा प्रसादच समजेन. याच काय पण दुसऱ्या कोणत्याही गोष्टींत असेंच समजेन—

पद. (चाल—मालकंस.)

तुझ्या हातची आमटीभाकरी । मानिन
शारदे वासुंदिपुरी ॥ ध्रु० ॥ स्वकरें दे-
शिल तोंडामधिं गे णेन चुंबियलें
अनुरागें । लाथेस्तव पद उचलिशि रागें
धरिन आनंदें तोचि मी शिरीं ॥ १ ॥

शा०—असें काय ? तर मग ही पहा ओली माती फांसली तुझ्या तोंडाला; आतां

इला काय समजतोस ? चंदनाची उटी का अर्गजा ? आतां तरी मुकाट्यानें जातोस का केरसुणी—नाहीं तुझ्या समजुतीनें चौरी आणूं?

ब्रा०—शारदे, असा माझा अपमान केलास काय ? कांहीं चिंता नाहीं. (मनांत) इचा नाद धरण्यांत कांहीं अर्थ नाहीं, हें द्राक्ष खरें. पण आंबट आहे. तर हें चोखायची इच्छा न करितां आतां आपण इथून जावें. (जातो.)

शा०—मेल्या, गेलास ह्मणून बरें झालें; नाहीं तर तुला जन्माची आठवण देणार होतें. मी वरीन तर प्रियकर आनंदकर यासच वरीन. आई जगदंबे, या कामीं तूं मला साह्य कर—

पद. (चाल—बिंबाधरा.)

अंबे तुला विमला वाहुनि कमला सु-
कोमला । ही बाला पूजी हिला दे आ-
नंदकर पती चांगला ॥ १ ॥

———

प्रवेश ७ वा.

(चहाचें दुकान.)

मुलें—अरे, गोविंदा, चहाचे सात कप आण.

गोविंद—सिंगल का डब्बल ?

मुलें—सिंगल काय म्हणन ? डब्बल आण. डब्बल.

गो०—(चहाचे कप देतो.)

मुलें०— पद. (चाल—जो लोककल्याण.)

पिउं सर्व मिळूनि हा । गरम आम्ही चहा । हा पितांना महा । मनि तोष वाटे । दिन सुट्टिचा आज । त्यजुनि भय विनय लाज । करुं इथें पुरति मौज । नच केली कोठें । चहावाला गोविंद । आमुचा पुरवि छंद । परि मोजितां छन् । छन् फाटे ॥ ***॥ १ ॥

गोविंदा, आणखी काय काय जिनसा आज तयार केल्या आहेस त्या सांग ?

गो०—सर्व कांहीं तयार आहे—

पद. (चाल—जरि करिन सकल.)

ही गरम गरम सोल्याचि उसळ । घ्या सोलापुरि चिवड्याचि मिसळ ॥ध्रु०॥ भाजि कांद्याचीं ताजीं नामी । नुकतिंच बनविलीं असती हीं मी । पैसे रोकड मोजाना तरि उधार नच मिळणार॥१॥

आणखी पहा—

साकी.

बुंदि बेसनाचे लाडू हे तैशी बासुंदि-पुरी । पंचामृतासह खाउनि जा आनंदें तुह्मी घरीं ॥ १ ॥

१ मु०—बरें, माझ्या जवळ अवघे दोनच पैसे आहेत; पण मला चिवडा तर जरूर पाहिजे आहे यासाठीं मला चहा नको. त्याबद्दल चिवडाच दे.

गो०—हं हा घे चिवडा. (देतो.)

१ मु०— पद.(चाल—नृपतनयेवर.)

हां हां ह्मणतां खाउनि आतां टाकितों पहा मी चिवडा । चहा नाहीं कॉफी

नाहीं ह्मणुनी झालों मी वेडा ॥ ध्रु० ॥
बासुंदिपुरी । लागते बरी । खाता अं-
तरीं । तृप्ति मिळे खरी । उधार दे तरी
जाउनी घरीं।पैसे आणुनी देतों लत्वरी॥
गो०-उधार कांहीं मिळणार नाहीं
जा जा जा ॥ १ ॥

३ मु०-अरे, हा नुसता चहाच पिऊन स्वस्थ बसला. दुसरं कांहीं घेत नाहीं.

४ मु०-अरे, त्याला जर पैसे न खर्च करितां आयतं मिळतं तर तो कां विकत घेईल ?

२ मु०—तें कसें काय मिळतें ?

५ मु०-तुला माहित नाहीं का ? पहा—

पद. (चाल-काय मला भूल.)

खाणावळिण काकु असे यावरी फिदा।
देत गोड खावयास यास ती सदा
भाचा हा मम ऐसें वरति सांगते। परि
चोरुनि हळूच यास डोळा मारिते।
नच लागे भोजनाविल यास द्यावें तें।
मालकास धत्तूरा यास मलीदा ॥ १ ॥

गो०—कां रे; माझी चेष्टा करितां फार? थांबा तुमच्या घरीं आतां जाऊन तुमच्या बापाला सांगतों. (जातो.)

सर्व—अरे, तो रागावून गेला; चल लौकर आपण त्याची समजावणी करूं.

(सर्व जातात.)

पूरणिका.

यानंतर शारदादेवीच्या देवळांत चोरून शारदा आणि आनंदकर यांचें लग्न लागतें व त्या निमित्त चहा कॉफी होऊन नाटक खलास होतें.

रिसबूड यांची निळी-काळी शाई.

१ रुपायास शंभर पुड्या पाव-आणा दराच्या घेणारांस चालू महिना-आखेर सर्वत्र लोकप्रिय झालेलीं दोन बुकें दि इंग्लिश टीचर किंमत १। रु. व इंग्रजी मीराठा लेटर-रायटर किं. १ रु. हीं बक्षीस मिळतील. व्ही. पी. निराळा पडेल.

डि. एम्. रिसबूड.